आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ११० वा ● रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


### विजेचा शॉक लागून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू ; भोकर तालुक्यातील जामदरी येथील घटना

भोकर – तालुक्यातील मौजे जामदार येथील शेतकरी शेतात जनावरे चारण्यासाठी गेला असता शेतातील लाईट पोलच्या तणाव्यात लाईट उतरल्याने त्यास हात लागून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी घडली.

मौजे जामदरी येथील शेतकरी साहेबराव गणपत बनसोडे वय ३२ हे दिनांक २१ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजता दरम्यान आपल्या शेतात जनावर चरवण्यासाठी गेले असता शेतातील विजेच्या खांब्याला लावलेल्या तणाव्यात विद्युत प्रवाह उतरल्याने विजेचा शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला. याबाबत मयताचे भाऊ प्रविण बनसोडे यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन भोकर पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार संभाजी हनवते करित आहेत.

## नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या नावासाठी प्रयत्न करणार– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

पुणे : पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला




जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कमिन्स महाविद्यालय, कर्वेनगर येथे आयोजित जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, प्राधिकरणाचे मुख्य प्रबंधक अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत महापुरुषांच्या ग्रंथानी, ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग हे भक्तीमार्ग असून या मार्गाने लाखो वारकरी पायी जातात. वारकऱ्यांच्या सुविधेच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरीता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावर संत ज्ञानेश्र्वर महाराज, संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल यांच्या प्रतिकृती, विजेची व्यवस्था, वृक्षाची पुर्नलागवड तसेच सुमारे ४२ हजार नवीन झाडे लावण्यात आली आहेत. आगामी काळात स्वयंसेवी संस्था आणि वारकऱ्यांनी या मार्गावर वृक्षारोपण करुन येत्या काळात हरित महामार्ग करण्याकरीता सहकार्य करावे.

एनएचएआयमार्फत नाशिक फाटा ते खेड, हडपसर ते यवत, कात्रज बोगदा ते रावेत, तळेगाव–चाकण–शिक्रापूर, पुणे ते शिरुर, पुणे ते छत्रपती संभाजीनगर अशी विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. येत्या डिसेंबरपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १ लाख ५० हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येतील. याशिवाय पुणे ते सातारा महामार्गाचा नवीन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन कामे करण्यात येतील. मुंबई– बेंगळुरू या द्रुतगती महामार्गाचे काम हाती घेण्यात आले असून पुण्याच्या वर्तुळाकार मार्गाला याचा लाभ होणार आहे, यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

**वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा देण्याचा प्रयत्न-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात वारीचे महत्त्व मोठे आहे. देहू, आळंदी आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्राकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असते. श्री विठ्ठलाच्या दर्शनाकरीता वर्षांनुवर्षे, शतकानुशतके अडचणीचा सामना करुन वारकरी श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आशेने पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत असतात. वारीत पोहचू न शकणारे भाविक आपआपल्या देशातून दर्शनाचा लाभ घेतात, त्यामुळे आपली वारी आता वैश्र्विक झाली आहे. वारकऱ्यांना योग्य प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजे, रस्ते रुंद झाले पाहिजे, पालखी मार्ग वेगळा करुन त्या मार्गावर सर्व प्रकारच्या सोई असल्या पाहिजे यादृष्टीने काम होत आहे. वारकऱ्यांना पालखी तळावरही विविध सोई–सुविधा देण्याकरीता त्याठिकाणी भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली असून त्यानंतर केंद्र सरकारच्या मदतीने कामे करण्यात येईल. येत्या काळात वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सोई–सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

पुण्याची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वर्तुळाकार मार्गाबाबत आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पुण्याहून सातारा, **(पान २ वर) ...**

# स्वच्छता ही सवय बनावी – राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

मुंबई : प्रत्येक मोठ्या कार्याची सुरुवात लहान लहान बाबींनी होत असते. सागरी किनारा स्वच्छतेसाठी आज जनजागृतीचा दिवस असून किनारा स्वच्छतेची ही सुरुवात मोठे रूप धारण करून ‘स्वच्छ भारत, महान भारत’ संकल्पनेला आकार देईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. तर, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



सागरी किनारा स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाचे आयोजन केले जाते. या अनुषंगाने पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने जुहू समुद्रकिनारा येथे समुद्रकिनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, केंद्रीय वन आणि पर्यावरण विभागाचे विशेष सचिव तन्मय कुमार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्र्विनी जोशी, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब आहे. सांडपाणी स्वच्छ आणि प्रक्रिया करूनच सागरात गेले पाहिजे तसेच सागर किनारे प्लास्टिक आणि कचऱ्यापासून मुक्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. निसर्गाने आपल्याला दिलेली प्रत्येक गोष्ट स्वच्छ स्वरूपातच निसर्गाला परत दिली पाहिजे, असे सांगून सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करण्याच्या केंद्र सरकारच्या अभियानात राज्याचे पूर्ण सहकार्य असेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. राज्यातही ‘स्वच्छता ही सेवा’ पंधरवड्याचा नुकताच शुभारंभ झाला असून राज्यात ४५०० ठिकाणी हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील ७२० किलोमीटर लांबीच्या किनापट्टीमध्ये नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अनेक समुद्रकिनारे आहेत. जगभरातील पर्यटक देखील स्वच्छ किनाऱ्यांना पसंती देतात. हे किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे. मुंबईत सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे, पावसाळ्यानंतर ते नियमित सुरू राहणार असल्याचे सांगून यामुळे प्रदूषणात मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे, शासनाच्या सर्व यंत्रणा, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या एकत्रित सहभागातून हे शहर आणि समुद्र किनारे स्वच्छ ठेवूया, असे आवाहन त्यांनी या निमित्ताने केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले, समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी जगभर जागृती अभियान राबविले जात आहे. देशात स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मिशन लाईफ या संकल्पनेतील स्वच्छ भारत बनविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधानांच्या ‘एक पेड मा के नाम’ या उपक्रमात सहभागी होऊन सर्वांनी किमान एक झाड लावावे, असे त्यांनी सांगितले. पाण्याच्या पुनर्प्रक्रिया करणाऱ्या स्टार्टअपसाठी केंद्र सरकारमार्फत मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.

प्रधान सचिव श्री. दराडे यांनी समुद्र किनारा स्वच्छतेबाबत माहिती देऊन मुंबईतील सर्व चौपाट्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून स्वच्छ केल्या जात असल्याचे सांगितले. तर तन्मय कुमार यांनी केंद्र सरकार मार्फत केल्या जात असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते यावेळी किनारा स्वच्छतेबाबत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. श्री. ढाकणे यांनी या अभियानात सहभागी सर्वांचे आभार व्यक्त केले.

राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्यासह मान्यवर, सामाजिक संस्था, विद्यार्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी आदींनी यावेळी आधुनिक सामग्रीच्या साहाय्याने जुहू किनाऱ्याची स्वच्छता केली.

## डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे यांची निवड

पुणे( प्रतिनिधी) : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून डोंगरचा राजाचे संपादक अनिल वाघमारे यांची नुकतीच निवड जाहीर करण्यात आली.



संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडीबद्दल सर्वच क्षेत्रातील मान्यवर,स्नेही मित्रांनी अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की,पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे आचार्य अत्रे सभागृहात नुकतीच मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेची राज्य स्तरीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेच्या कार्यक्रमात गेल्या अनेक वर्षांपासून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्र्वस्त श्री.एस.एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात परिषदेचे काम करत असलेले तसेच श्री.एस.एम.देशमुख यांचे अत्यंत विश्र्वासू म्हणून ओळखले जाणारे संपादक अनिल वाघमारे यांची डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित असलेले परिषदेचे मुख्य विश्र्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी त्यांची प्रदेशा ध्यक्ष म्हणून निवड केली जात असल्याचे जाहीर करताच सभागृहात टाळ्यांचा गजर करत उपस्थित हजारो पत्रकार बांधवांनी त्यांचे अभि नंदन केले.संपादक अनिल वाघमारे हे गेली अनेक वर्षे मराठी पत्रकार परिषदेच्या जडण घडणीत मोलाचं काम करत आले आहेत.बीड जिल्ह्यातल्या वडवणी या छोट्याशा तालुक्यात त्यांनी आपल्या पत्रकारीतेचा प्रारंभ केला.सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणीतून सतत पाठपुरावा केला.बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय,सामाजिक,धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.त्यांची एकनिष्ठता, संघटन कौशल्य आणि अनुभव या सर्वांचा विचार करून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्र्वस्त श्री.एस.एम. देशमुख यांनी त्यांची निवड जाहीर केली आहे.संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्यातील पत्रकार, स्नेही मित्र व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# काँग्रेसची भूमिका सदैव आरक्षणविरोधी

मुंबई : राहुल गांधी यांच्या अमेरिका दौ–यातील वक्तव्यावरून आरक्षण विरोधी काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला आहे. काँग्रेसला मागास व अनुसूचित समाजाची उन्नती नको आहे. पं.जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी,राजीव गांधी यांच्या काळापासून काँग्रेस केवळ व्होटबँकेच्या तुष्टीकरणाचे राजकारण करत आहे, अशी टीका भाजपा गुजरात प्रदेश महासचिव खा.विनोद चावडा यांनी शनिवारी केली. भाजपा प्रदेश कार्यलायात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अनुसूचित जाती मोर्चा मुंबई अध्यक्ष शरद कांबळे, सरचिटणीस राहुल कांबळे आदी उपस्थित होते.

श्री.चावडा म्हणाले की, इतिहासात डोकावले तर काँग्रेसने नेहमीच आरक्षण धोरणाला विरोध केला आहे. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वांच्या विरोधात काम केले आहे. काँग्रेसच्या आरक्षणविरोधी कृतींची यादीच त्यांनी सादर केली. काँग्रेसने नेहमीच अनुसूचित जाती, जनजाती, मागास आरक्षणाला विरोध करत या समाजांच्या हक्कांवर गदा आणली, असे खा. चावडा यांनी नमूद केले.

मोदी सरकार सदैव ओबीसी, एससी आणि एसटी यांच्या पाठीशी उभे राहिले आहे. भाजपा सामाजिक न्यायावर विश्र्वास ठेवतो. भाजपा कोणाचेही तुष्टीकरण करत नाही असेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार मागास समाजांच्या विकासासाठी, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी झटत आहे. देशातील आदिवासींच्या कल्याणासाठी पावले उचलण्यात मोदी सरकार तत्पर असून देशाच्या विकासासाठी या समाजाच्या योगदानाचाही ते उचित सन्मान करत आहे असेही खा.चावडा म्हणाले.

खा.चावडा यांनी सांगितले की, काँग्रेसने घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वारंवार अवमान केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा धार्मिक आरक्षणाला विरोध असताना काँग्रेसने त्यांच्या विचारांचा मान कधीच राखला नाही. डॉ.आंबेडकर यांचा भारतरत्न म्हणून गौरव केला नाही. डॉ.आंबेडकरांचा निवडणुकांमध्ये पराभव करण्यासाठी अनेक प्रयत्न काँग्रेसने केले आहेत. काँग्रेसने अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी आणि जामिया मिलिया इस्लामिया सारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये एससी,एसटी,ओबीसी आरक्षण संपुष्टात आणले. व्होटबँकेचे राजकारण करत काँग्रेसने आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडूमध्ये देखील मुस्लीमांना आरक्षण दिले. ही काँग्रेसची कृती संविधानविरोधी कृती होती असा घणाघात ही त्यांनी केला. कर्नाटकमध्ये ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण मुस्लीमांना दिले. काँग्रेसने ओबीसी आयोगाला सांविधानिक दर्जा कधीच दिला नाही.१९८१ मध्ये एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण हटवण्यासाठी ‘एएमयू सुधारणा कायदा’ काँग्रेसने आणला, असेही त्यांनी सांगितले.

# मराठा आरक्षणासाठी सोमवारी लातूर जिल्हा बंदचे आवाहन

लातूर, प्रतिनिधी : मराठा समाजाची परवड दिसत बाहेर काढण्यासाठी व त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण मिळणे हाच एकमेव पर्याय आहे. हे आरक्षण मिळावे यासाठी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण योध्दे मनोज जरांगे पाटील हे प्राणांतिक उपोषण करीत आहेत. त्यांची प्रकृती ढासळली आहे तरिही शासन हा विषय मार्गी लावण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. विरोधकही या प्रश्र्नाशी आपले काहीएक देणेघेणे नाही आशा भूमिकेत आहेत याच्या निषेधार्थ, तसेच जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ आरक्षणासाठी हा बंद असल्याचे समाज बांधवांच्या वतीने सांगण्यात आले.




आरक्षण योध्दे मनोज जरांगे यांच्या अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ व मराठा समाजास ओबीसीतून तातडीने आरक्षण द्यावे या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवार २३ सप्टेंबर रोजी लातूर जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदसाठी समाजबांधवांनी उत्सफूर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मराठा आरक्षणासाठी समाज सातत्याने संघर्ष करीत आहे. आरक्षणाअभावी होत असलेली असताना सरकार व विरोधक हा प्रश्र्न गांभिर्याने न घेता त्याचे सातत्याने राजकारण करीत आहेत. शिक्षण घेऊन नोकरी मिळत नसल्याने अनेक युवकांनी आत्महत्या केल्या आहेत व त्या सुरूच आहेत. आर्थिक हतबलतेने अनेकांना शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागत आहे. या आपत्तीतून समाजाला

## सह्याद्री वाहिनीवर उद्या राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार कार्यक्रम

मुंबई : राज्यातील १०९ गुणवंत शिक्षकांचा ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते ‘क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कार समारंभाचे प्रसारण रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून केले जाणार आहे.




मुंबईतील एनसीपीएच्या सभागृहात या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यांना हा समारंभ पाहता आला नाही, त्यांच्यासह सर्वांनी सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणारा हा कार्यक्रम अवश्य पाहावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले आहे. निर्माता जयु भाटकर आणि वैष्णो व्हिजन यांनी या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे.

**दिवाळी अंक निमित्त जाहिरातीसाठी संपर्क करा !**

सर्व दैनिक लातूर प्रभात या वृत्तपत्र वाचकास नम्र विनंती की, दरवर्षा प्रमाणे याही वर्षी दिवाळी निमित्त विशेष अंक प्रकाशीत करण्यात येत आहे, कृपया आपल्याकडून जाहिरातीची अपेक्षा आहे.

E-mail.
laturprabhat@gmail.com

## झरोका

एक - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे शासकतेतील सर्जनशील नेते आहेत असा दावा भाजपा नेते करीत आहेत त्यांच्याबद्दल आश्चर्य वाटते. अशा तोंड-पाय चाटक्याना काय बोलावे हेच कळत नाही डोकं बधीर झालंय .

दुसरा - अरे, तुझ्याकडे डोकं आहे पण खोकं नाही म्हणून तू बरळतो आहेस. सत्ते पुढे शहाणपण चालत नाही हे लक्षात ठेव.

एक - अहो, शहाणपणाचे दिवे पाजळू नका, काश्मीरची काय अवस्था आहे, मणिपूर काय धगधगते आहे, महिला-मुलीवर अन्याय-अत्याचार होत आहेत, महागाई-भ्रष्टाचारावर उपाय नाही केवळ फोडाफोडीच्या राजकारणातून सत्ता संपादन करणे हेच एक धोरण असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सर्जनशीलता जोपासणारे शासक म्हणणे चुकीचे वाटते म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे, सर्जनशील, की सजनशील व्यक्ती कोण असेल ती मतदारच. शासक म्हणजे लोकप्रतिनिधी आणि प्रशासक म्हणजे नोकरदार अधिकारी,कर्मचारी मग सर्जनशीलता जोपासणारे म्हणजे सर्जन म्हणजे शस्त्रक्रिया करणारा व्यक्ती अर्थात नरेंद्र मोदी मग कशाला बोंबलतो आहेस.

एक - अहो, जास्तीचे बोलू नका, बसपाच्या बहन मायावती यांनी सोशल इंजिनिअरिंग केले होते अर्थात सामाजिक अभिसरण केले होते,पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे भलतेच करीत आहेत म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे ,नरेंद्र मोदी असे कसे करतात -वागतात बहन मायावती यांनाच विचार म्हणजे काय ते कळेल.

## काय बोलता राव ?

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य-दिव्य असा ७५ फुटी पुतळा उभारण्यासाठी लातूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी पुतळा कसा असावा-नसावा यासाठी सोडत काढली असून मर्यादित वेळेत सूचना मागविल्या आहेत कारण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, आधुनिक भारताचे भाग्यविधाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तीन प्रतिमा प्रकाशित करून कोणत्या प्रकारची प्रतिमा पुतळा हवा आहे हे जनमत अवलोकन करण्याचा प्रयत्न हा बाबासाहेब मनोहरे यांचा फाजीलपणा नव्हे काय.

**काय बोलता राव,**

अरे, लातूर मनपाचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे हे मागासवर्गीय-आंबेडकरवादी असले तरी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य असावेत म्हणूनच त्यांनी बाबासाहेबांनी संविधान हाती घेऊन आकाशाला गवसणी घालण्यास हात-बोट असलेला पुतळा, त्यात संविधान हाती घेऊनच हात खाली केलेला व तिसरा चक्क सावधान पणा बाळगलेला पुतळा जाहीर करून चक्क बाबासाहेबांचीच नव्हे तर आंबेडकरी जनतेचीच निराशा-अवमान केला आहे त्यास हटाओ आंदोलन केले पाहिजे मग काय तेच बोला दाजीबा.

# नंदीबैल कोण ?

## संपादकीय...

बाराबलूतेदारा पैकी एक घटक पूर्वीपासूनच खेडोमाडी नंदीबैलाला झुळ पांघरून स्वतः चे पोट भरण्यासाठी कसरत करून मिळेल ते धान्य-अणा- दोन आणे जमवून घरसंसार भागवत असे. ते अर्थातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भागवत नसावेत असा अंदाज मांडला, घेतला तरी आज घडीला शास्त्रज्ञ-वैज्ञानिक वगैरेना जो काही पुरस्कार दिला जातो त्यात लायक कोण आणि नालायक कोण याचा विचार न करता केंद्र सरकार म्हणजेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कोणते मापदंड लावून कोणास वैज्ञानिक- शास्त्रज्ञ म्हणून पुरस्काराने गौरवीत करतात याचे भान खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनाच नसेल तर सर्व सामान्यातील असामान्य व्यक्ती, विचारवंत आणि सक्षम वैज्ञानिक शास्त्रज्ञांनी गप्प बसलेलेच पुरे अशीच संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

नंदी कोन, बैल कोन हा संशोधनाचा विषय असला नसला तरी नंदीबैल आहेच. यात संदेह नाहीच. लोकसभा निवडणुकीनंतर जो कोणी पंतप्रधान होतो त्यांच्या अधिपत्याखालील मंत्री-खासदार नंदीबैलच होतात विधानसभा निवडणुका झाल्या की जो कोणी मुख्यमंत्री होतो त्याच्या अधिकाराखालील मंत्री- आमदार नंदीबैलच ठरतात पण आज तशी अवस्था राहिली नाही कारण केंद्र सरकार आणि राज्य सरकारात एक पक्षीय सत्ताच नसल्याने ढळमिसळ सरकार कार्यरत असल्याने नंदीबैल कोणत्या नंदी आणि बैल अशी उजळणी कोण करणार हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

काल परवा कुठेतरी शास्त्रज्ञानांना पुरस्कार वितरण करण्यात आले त्यावेळी नागपूर येथील राष्ट्रीय विज्ञान परिषदेत बीज माता पद्मश्री राहीबाई पोजेरे या बोलत असताना त्यांचा माईक बंद करण्यात आला जसे लोकसभा-राज्यसभेत विरोधक बोलत असतात त्याचप्रमाणे ही बाब घडली असावी यात संदेह नसावा पण कोणीतरी किती दिवस नंदीबैल म्हणून राहतील हा प्रश्न अंनूतरीतच राहतो.

गुबू गुबू वाजवून आणि नंदीबैल गाव खेड्यात सजून गेला की मोठी भोळीभाबडी मंडळी पाऊस पडेल काय असा सवाल मागणी वजा केला की डोंबारी गुबू गुबू आवाज काढला की नंदीबैल मान- डोकं -सिंग हालवून तशी साद देत असे हा मनूसंस्कृतीचा एक भाग असला तरी एकेकाळी आरएसएसशी ताबा असलेले पुणे येथील गोखले संस्था विचारवंत,पुरुगामी ,धर्मनिरपेक्ष व्यक्तीच्या हाती गेल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे डोके सैराट बनले असल्यास त्यात नवल कसले म्हणूनच विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय शिक्षण संस्थांना आदेशित करून त्या डॉ. रानडे यांना पदमुक्त करण्याचा सल्ला- निर्णय घेतला पण रानडे हे थोडेच नंदीबैल ठरावेत त्यांनी न्याय मागितला आणि त्यांना आधार मिळाला असला तरी संवैधानिक संस्था, केंद्र सरकार, राज्य सरकारेच नंदीबैल होत असतील तर वास्तवातला नंदीबैल मतदार की लोकप्रतिनिधी, शासक की प्रशासन हे ठरविणे गरजेचे वाटते .

# बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३७ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## नवीन विमानतळाला...

**(पान १ वरुन)...**छत्रपती संभाजीनगर, नाशिक, मुंबईकडे जाताना वाहतूक कोंडी सोडविण्यासोबत औद्योगिक विकासाला लागणाऱ्या पूरक बाबीचे नियोजन करण्यात आले आहे. पुण्यात विविध पुलांचे बांधकाम करण्यात येत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकरिता मोठ्या प्रमाणात ई-बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून आगामी काळात १ हजार ई-बसेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्यास मदत होणार आहे. आगामी काळात सर्व सोई-सुविधांयुक्त महत्त्वाचे शहर म्हणून पुणे शहर ओळखले जाईल. पुणे नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नामकरण करण्याबाबत येत्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडण्यात येईल, आणि केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. पुण्याच्या मेट्रोचे एक एक टप्पे पूर्ण करण्यासोबत नवीन टप्पे मंजूर करण्याचे काम सुरु आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी ३ लाख ५० हजार प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला. हे पाहता पुणे शहराला मेट्रोची आवश्यकता लक्षात येते. त्यामुळे मेट्रोचे जाळे अधिक विस्तारित करण्याचे काम करण्यात येत आहे. केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले, केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांच्या संकल्पनेतून श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि श्री संत तुकाराम पालखी मार्गांचे बांधकाम होत आहे. रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून गेल्या १० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक महामार्ग निर्माण झाले आहेत, असेही केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले. सहकार मंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले की, पुणे शहर एक मोठे केंद्र झाले आहे. शहरातील वाहतूक सुरळीत करण्याकरीता पुणे ते छत्रपती संभाजीनगर, नाशिक तसेच तळेगाव ते चाकण रस्त्यांची प्रलंबित कामे करुन प्रश्र्न मार्गी लावावी. देहू, आळंदी आणि पंढरपूर विकास आराखड्याला गती देण्याकरीता केंद्र सरकारने सहकार्य करावे.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले की, पालखी महामार्गांवरून जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध सुविधा करण्यात आल्या आहेत; दिवसेंदिवस वारकऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता पालखीतळाच्या ठिकाणी कायमस्वरूपी निवारा आणि शौचालयाची व्यवस्था करावी, अशी सूचना करुन वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना सहकार्य करण्यात येईल, असे मंत्री श्री. पाटील म्हणाले.यावेळी खासदार श्रीमती कुलकर्णी, श्रीमती सुळे व आमदार श्री. तापकीर यांनीही विचार व्यक्त केले. श्री. श्रीवास्तव यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.

# पितृपक्षातील हाडपक्या(मस्कऱ्या) गणपती उत्सव हा प्राचीन परंपरेचा मोठा उत्सव.

पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते.परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २६९ वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो.यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे.नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे 'हाडपक्या गणपती'. हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो. पुर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिक रीत्या हा उत्सव साजरा होत असत. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात पितृपक्षाला हाडपक असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला 'हाडपक्या गणपती' असेही संबोधले जाते.राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली.भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरूप सुध्दा दिले जाते आणि हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते. इ. स. १७५५ मध्ये नागपूरातील भोसले घराण्यातील तत्कालीन राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले उर्फ चिमनाबापू हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपतीउत्सव साजरा करू शकले नाही. त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपतीउत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.तेव्हा पासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे. त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल.याकाळात लावण्या, नकला,भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे.यावेळी अनेक गंमतीजमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा,मस्करी, नाटक खडी गंमत इत्यादींचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच मस्कऱ्या हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला 'मस्कऱ्या गणपती' नावाने प्रसिद्ध मिळाल्याचे सांगितले जाते.असे म्हणतात की लोकमान्य टिळकांनी ह्याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजानिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले आणि यातूनच त्यांनी स्वातंत्र्याचा लढा उभा केला.हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते.या उत्सवाला आज २६९ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच ही ऐतिहासिक परंपरा आहे.श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते. त्याकाळी लावण्या,भारूड,पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्म कार्यक्रम आले यात आर्केस्ट्र, सुगम संगीत, नाटक, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते. हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते. यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला अत्यंत महत्व असते.मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो यातुनच आपली जडणघडण व विविधता दिसून होते,आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते.यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते.ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.गणपती बाप्पा मोरया!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं९९२१६९०७७९,**
**नागपूर**

# मसला, तांदूळजा येथे महिला मेळावा

लातूर(प्रतिनिधी) : महिलांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे. घर, प्रपंच चालविण्यामध्ये महिलांचा सर्वाधिक वाटा असतो. महिला आता आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली पाहिजे. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांचे अनेक प्रश्र्न सुटण्यास मदत होते. त्यामुळे महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहात आर्थिक स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा त्यासाठी आवश्यक ते सहकार्य करु, अशी ग्वाही विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी दिली.



### विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी आशिर्वाद द्यावा

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत मतदारसंघात विविध विकास कामांच्या योजना आणुन मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला. नवनवीन योजनांच्या माध्यमातून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलला. विकास कामांचा वेग कायम ठेवण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीतही आमदार धिरज देशमु यांना मतदारांनी आशिर्वाद द्यावा, असे यावेळी बोलताना रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा देशमुख म्हणाल्या.

सरपंचपदापासून ते संसदेच्या सभापतीपर्यंत पोहोचल्या आहेत. महिलांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे.आर्थिक क्षेत्रात महिलांनी स्वावलंबी होण्याची गरज असून त्यासाठी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून महिला बचत गटांना आवश्यक सहकार्य करु, असे आश्र्वासन त्यांनी दिले.

येत्या काही दिवसांत विधानसभा निवडुकीची रणधुमाळी सुरु होईल.त्यानिमित्ताने भाजपा महायुतीकडून पुन्हा दिशाभूल करणारी जाहिरात आणि खोटी आश्र्वासने दिली जातील. मतदारांनी खास करुन महिला भगिणींनी त्यांच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन करुन श्रीमती वैशालीताई देशमुख पुढे म्हणाल्या, धिरज देशमुख यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला. पाणी, वीज, रस्ते, आरोग्य सुविधा निर्माण केल्या आहेत. विविध योजनांतून विकास कामांसाठी मोठ्याप्रमाणात निधी खेचून आणला. विकासाची ही प्रक्रिया कायम राहण्याकरीता मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी आपला आशिर्वाद द्यावा, असेही त्या म्हणाल्या.

लातूर तालुक्यातील मसला व तांदूळजा येथे दि. २१ संप्टेंबर रोजी महिला बचत गटाच्या मेळाव्याचे आयोजन केरण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, मांजरा साखर कारख्याचे माजी संचालक मदन भिसे, अश्र्वीन स्वामी, शिवाजी बावणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या की, काँग्रेस पक्षाने महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये सक्षम करण्यासाठी असंख्य योजना, धोरणे राबविली आहेत. एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला असल्याने या महिलांना राजकीय क्षेत्रात संधी मिळावी म्हणून काँग्रेस पक्षाने सर्वप्रथम महिलांना राजकीय आरक्षण देण्याचे धोरण राबविले. त्यामुळेच आज महिला ग्रामपंचायतीच्या

याप्रसंगी नरेंद्र आलटे, अक्षता शिंदे, अश्र्वीनी स्वामी, शरयु गायकवाड, नानासाहेब गायकवाड, वनिता बावणे, शोभा चव्हाण, रेखा कदम, दिपाली पावार, जयश्री देयमुख, सुनिता ओव्हाळ, अक्षता भगत, प्रियंका सांळुके, मंदाकिनी कदम, प्रियंका घोडके, प्राची शिंदे, जयश्री पोळ, श्रुती पालकर, अंजली नरवडे, जिवीका देवकते आदी महिला उपस्थित होत्या.

# एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा उद्घाटन सोहळा संपन्न

लातूर : महाराष्ट्र शासनाने आजच्या स्पर्धेच्या जगात आपल्या युवक युवतींना सक्षम बनवण्यासाठी काही महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र उभारण्यासाठी परवानगी दिली आहे. या योजने अंतर्गत एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षापासून हे केंद्र कार्यरत होत आहे.



या उपक्रमाचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता पंतप्रधान मा.श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते औनलाइन पध्दतीने करण्यात आले व सर्व उपस्थितांना त्यांनी या कौशल्य विकास केंद्र उभारण्याबाबतची संकल्पना विषद करून सांगितली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयीन शिक्षणासह व्यावसायिक कौशल्य विकसित करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचेही त्यांनी यावेळी नमुद केले.

या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री श्री अजित पवार, मा.श्री देवेंद्र फडणवीस यांची समयोचीत भाषणे झाली.

हा संपूर्ण कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपण सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.या सोहळ्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव मा.श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव मा.श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष मा.श्री विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक मा.श्री प्रदिप दिंडीगावे, संचालक मा.श्री बाबुराव तरगुडे, प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे प्रभारी प्राध्यापक विश्र्वजीत जाधव, तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये एआय- डेटा सायंटिस्ट आणि इलेक्ट्रीकल व्हेईकल टेस्ट इंजिनियर हे दोन अभ्यासक्रम राबवले जाणार असल्याचे प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी यांनी माहिती दिली.

# सामाजिक न्याय विभागाच्या मुलींच्या वसतीगृहात महिला आयोगाच्या अध्यक्ष जातात तेंव्हा..!!

जळगाव( जिमाका) - शालेय जीवन हे रोपटे आहे, त्याला अभ्यासरुपी संस्कार देऊन त्याचे वृक्षात रूपांतर करण्याचे काम दुसरे कोणी नाही तर स्वतः करायचे असते याची जाणीव होण्यासाठी आयुष्याचं ध्येय निश्र्चित करायचे असते. ते ध्येय मग तुम्हाला कोणतेही प्रलोभन आले तरी विचलित करत नाही. हे सगळं राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर सांगत होत्या, मध्येच त्या आपल्या शालेय जीवनातील आठवणी सांगत होत्या. त्यात त्याही तल्लीन झाल्या होत्या आणि ऐकणाऱ्या मुलीही समरस झाल्या होत्या.



सामाजिक न्याय न्याय विभागाच्या मागासवर्गीय मुलींच्या वसतीगृहात त्यांचा कोणताही पूर्व नियोजित दौरा नसताना आल्या. जळगाव जिल्ह्यात त्यांचा १८ आणि १९ सप्टेंबर या दोन दिवसाचा दौरा होता. तो नियोजित दौरा पूर्ण करून त्या १८ सप्टेंबर रोजी संध्याकाळी मुलींच्या वसतीगृहात आल्या.

## मुलींशी मनसोक्त गप्पा

यावेळी त्यांनी मुलींशी मनसोक्त गप्पा मारल्या, सुरुवातीला अवघडलेल्या मुली नंतर त्यांच्या संवादात एकरूप झाल्या. यावेळी मुलींनी मनात असलेल्या अनेक प्रश्र्नांना वाट मोकळी करून दिली. यावेळी श्रीमती चाकणकर यांनी आईच्या ममतेनी मुलींना वाढते सायबर गुन्हे, त्यात होणारी मुलींची फसवणूक याबाबत सविस्तर माहिती दिली. या सायबरच्या मायाजाळात न अडकता आपल्याला जीवनात कसे यशस्वी होता येईल, जेणे करून आपल्या माता - पित्याची मान अभिमानाने उंचावेल हे पहा.

त्यांनी महिलांच्या सुरक्षितते विषयीचे कायदे, महिला आयोगाचे कामकाज, महिलांच्या सबलीकरणासाठीच्या शासनाच्या योजना याची सविस्तर माहिती दिली. या वेळी त्यांनी वसतीगृहातील स्वयंपाक घरात जाऊन जे मुलींना रोज जेवण दिले जाते. त्या जेवणाचा आस्वादही घेतला. वसतीगृहातील सोयीसुविधांची पाहणी केली.

याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी सविस्तर माहिती दिली. महिला आणि मुलीसाठी सामाजिक न्याय विभाग जिल्ह्यात काय काय करत आहे हे पण विशद केले. याप्रसंगी महिला व बालकल्याण अधिकारी विनिता सोनगत, अधिक्षक वैशाली पाटील उपस्थिती होत्या.

# निवळी गणेशोत्सव मंडळातर्फे रांगोळी स्पर्धा संपन्न

निवळी, ता. लातूर : विलास सहकारी साखर कारखाना लि. युनिट-१, वैशालीनगर, निवळी, येथे गणेशोत्सव मंडळातर्फे दिनांक १४ सप्टेंबर रोजी निवळी येथील निळकंठेश्र्वर विद्यालय येथील विद्यार्थीनींकरिता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेस खूप चांगला प्रतिसाद मिळाला व ७० विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व महिलांच्या कलेला वाव या हेतुने गणशोत्सव मंडळाचे अध्यक्ष व कारखान्याचे संस्थापक मा.आ.अमित विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार विलास साखर गणेशोत्सव मंडळातर्फे कारखाना साईटवर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

शाळकरी मुलींचा एक गट तसेच वरीष्ठ मुली व महीलांचा एक गट असे दोन गटात स्पर्धेचे आयोजन केले होते. शाळकरी मुलीमध्ये निळकंठेश्र्वर विद्यालयातील मुलींनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला. प्रत्येक गटानुसार तीन स्पर्धक प्रथम, द्वितीय व तृतीय असे निवडले प्रथम पुरस्कार रु.२१००/- प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह, द्वितीय पुरस्कार रु.१५००/- प्रशस्तीपत्र व सन्मान चीन्ह आणि तृतीय पुरस्कार रु.११००/- प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्हे असे स्वरुप आहे.

पुरस्कार प्राप्त स्पर्धकांची निवड व स्पर्धेचे स्वरुप ठरविण्यास निळकंठेश्र्वर विद्यालय, निवळी येथील शिक्षक वर्गाची मोलाची मदत झाली. तसेच ज्या स्पर्धकांची पुरस्कारास निवड झाली नाही त्यांना सुध्दा मंडळाने प्रोत्साहनपर बक्षिस म्हणुन रोख बक्षिस दिले गेले, जेणे करुन महीलांना व मुलींना त्यांची गुणवत्ता सिध्द करणेस प्रोत्साहन मिळुन पुढील काळात आणखीन मोठया संख्येने अशा स्पर्धेत भाग घेण्यास उत्सुकता वाढेल हाच गणेशोत्सव मंडळाचा उद्देश आहे. असे मंडळाचे कार्याध्यक्ष व कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री. संजीव देसाई यांनी यावेळी नमुद केले. स्पर्धेवेळी कारखान्याचे व्हा.चेअरम रविंद्र काळे, सेक्रेटरी एन.एन.काळोखे, जनरल मॅनेजर (टेक्नि) एम.पी.भोरकडे, फायनान्स मॅनेजर ओ.पी.ठाकरे, चिफ केमिस्ट एल.एम.देशमुख, मुख्य शेतकी अधिकारी एस.एस.कल्याणकर, डिस्टीलरी मॅनेजर डी.जे. जाधव, चिफ अकौंटट सी.एच. कानवटे, मंडळाचे पदाधिकारी, नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर रांगोळी स्पर्धेत महिला गटात कावेरी शिवाजी शिंदे, संध्या संजय शेंडगे व अरूणा मेकीले यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. मुलींच्या गटात नंदीनी काकासाहेब ढोकळे (निळकंटेश्र्वर विद्यालय निवळी) सृष्टी दिलीप सुरवसे व अंकिता काकासाहेब पाडूळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

स्पर्धेत विजेते झालेल्या स्पर्धकांना कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशालीताई विलासरावजी देशमुख यांचे शुभ हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्हे व रोख रक्कम देवून गौरविण्यात येणार आहे.

विजेत्या स्पर्धकांचे मांजरा परिवाराचे आधारवड मा.श्री.दिलीपरावजी देशमुख साहेब, माजी मंत्री व कारखान्याचे संस्थापक मा.आ.अमित विलासरावजी देशमुख साहेब, लातूर ग्रामीणचे आमदार मा.धिरज विलासरावजी देशमुख साहेब व कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख मॅडम यांनी अभिनंदन केले आहे तसेच विलास साखर गणेशोत्सव मंडळा प्रमाणे इतर गणेशोत्सव मंडळ व संस्थांनी अशा स्पर्धा आयोजीत करण्याबाबत अवाहन केले आहे.

# 'आउट ऑफ बॉक्स' विचार करून जैवतंत्रज्ञान शाखेत संशोधन करावे : डॉ.बी.एस.नागोबा

लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रद्यान विभागाने अभ्यासक्रमात असलेल्या विविध वैज्ञानिक तसेच त्यांच्या संशोधन कार्य याचा आढावा घेण्याचा वैज्ञानिकाचा जयंतीचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आउट ऑफ जाऊनही नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणली.ज्यामध्ये असे दिसून येते की,आजच्या काळात वैज्ञानिकांचा देखील विचार केला जातो.अशा इनोव्हेटिव्ह आयडिया डोक्यात ठेऊन हा चांगला उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी राबवत आहेत,असे प्रतिपादन डॉ.बी. एस.नागोबा यांनी करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी चार्ल्स ज्युल्स हेन्री निकोल यांची १५७ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात एम.आय.एम.एस.आर.लातूर येथील असिस्टंट डीन डॉ.बी.एस. नागोबा,महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिध्देश्र्वर बेल्लाळे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ.राहुल मोरे आणि डॉ.कोमल गोमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.सुभद्रा परगे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.द्वितीय वर्षातील तनुजा लोखंडे या विद्यार्थिनीने वैज्ञानिकाबद्दलची माहिती प्रकाशझोतात आणली. चार्ल्स ज्युल्स हेन्री निकोल यांचा जन्म २१ सप्टेंबर १८६६ रोजी झाला.ते एक फ्रेंच जीवाणूशास्त्रज्ञ होते,ज्यांना महामारी टायफसचा प्रसारक म्हणून उवा ओळखल्याबद्दल वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांचा मृत्यु २८ फेब्रुवारी १९३६ रोजी झाला.

याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने,प्रा.अवंती बिडकर,डॉ. फिरदोस बिरादार,प्रा.अनुराधा शिंदे पाटील,डॉ.नितीन चौहान,प्रा.स्वरूप गावकरे व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांधकाम कामगार आरोग्य तपासणी कोटयावधीचा घोटाळा.

महाराष्ट्र शासन कामगार विभाग महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेकडून असंघटीत क्षेत्रातील बांधकाम बांधकाम कामगार यांचे हिताचा मुद्दा ध्यानात घेऊन,विविध आर्थिक शैक्षणिक वैधकीय समाजिक संरक्षण अशा विविध ३१ योजना शासन विना पक्षपाती पणाने राबवित असते,बांधकाम कामगार यांचे काम अंगमेहनतीचे शाररीक कष्टाचे आहे, कामावर तार खिळा,मोठा दगड,माती,सिमेंट,लाकूड अशा विविध माधयमाशी निघडीत असते, कामावर असताना होणारी दुखापत,धुरळा धुळ यापासून श्र्वाँसाचे आजार,धनुरवात, फुफुसाचे आजार,लिवहर,किडणी आजार,असे विविध आजार उदवभतात आणि तया बांधकाम कामगारांना आपला जीव गमवावा लागतो आणि मग मुलमुली,आईवडील पत्नी यांचे जीवन कष्टमय होते,शासनाने हे सर्व थांबावे आणि बांधकाम कामगार व तयाचे कुटुंब निरोगी जीवन जगावे यासाठी २१/१२/२०१९ रोजी बांधकाम कामगार आरोग्य तपासणी ही संकल्पना अमलात आणली, या मध्ये बांधकाम कामगार यांच्या विविध ३६ आरोग्य तपासणी केली जाते,या मध्ये नाक,कान,डोळा,उंची,हिमोगलोबिन ,मगनेशिअम,एडस,एच सी व्ही,एच बी एस ए जी,कॅन्सर,विटामीन बी १२,विटामिन डी, कोलेस्ट्राल,नायटोरोजन,कलशिअम,मलेरिया,अशा विविध तपासणी बांधकाम कामगार व तयाची मुलमुली १० वर्षा वरिल,पत्नी,यांचेसाठी शासन प्रति वर्ष प्रति महिला कामगार पुरुष कामगार ३९०० रुपये खर्च करत आहे,

आज हे सर्व बांधकाम कामगार तपासणी करणेचे टेंडर एसोसिएट्स व्हाईस प्रेसिडेंट मार्केटिंग,में एच एल एल लाईफकेअर लिमिटेड एल एल एल भवन पुजापुरा तिरुअंनतपुरम केरला यांना २०१९ पासून २८/६/२०२२ ते पाच वर्ष मुदत वाढ देण्यात आली आहे, में एच एल एल लाईफकेअर लिमिटेड एल एल एल भवन पुजापुरा तिरुअंनतपुरम केरला यांनी सांगली जिलहा मधील एक लँब, हिंद लेब एन ईनवहाईट ऑफ गव्हरमेंट ऑफ इंडिया एंटर प्रायजेस यांना सांगली मध्ये बांधकाम कामगार तपासणी करणेचे काम दिले गेले आहे.हिंद लेब यांनी बोगस महिला व पुरुष डॉक्टर भरले आहेत,धनवंती इनामदार, सोनाली निंबाळकर रजिस्ट्रेशन नंबर ३०६१३ए१,धैर्यशील साळुखे,पल्लवी सक्सेना, पोनाला प्रमोद कुमार रजिस्ट्रेशन नंबर ९४५७७, हे डॉक्टर नेमणेत आले आहेत हे सर्व पुणे, हैदराबाद,अशा विविध ठीकणी यांचे ओ पी डी आहे, हे कोणतया विषयाचे स्पेशालिस्ट आहेत याचा कोठेही उल्लेख नाही, शासन निर्णय नुसार बांधकाम कामगार तपासणी करणेसाठी सक्षम डॉक्टर यांचे निरक्षणा खाली जागो जागी कामगार तपासणी कॅम्प लावणे या सर्व डॉक्टरनी उपस्थित रहायचे आहे.पण हे डॉक्टर आजतागयत कुठही हजर राहत नाहीत.पण रोज बांधकाम कामगार तपासणी रिपोर्ट वर यांची कार्बन सही मारली जात आहे,रिपोर्ट मध्ये सर्व तपासणी मुधदे एक सारखेच आहेत,डोळा खराब नसणारे नजर कमी आहे असा रिपोर्ट आहे, बी पी शुगर रिपोर्ट बोगस आहेत, फुफुसाचे चेकअप झाल नाही तरी आजार लिवहर किडणी यांचे कुठही चेकअप झाले नाही तरी आजार दाखवला जात आहे, बांधकाम कामगार तपासणी रिपोर्ट बांधकाम यांना समक्ष देणेचे आहे पण कोणतयाही बांधकाम कामगारांना हे तपासणी रिपोर्ट पोहोच केले जात नाहीत,रक्त तपासणी जेवना अगोदर आणि जेवना नंतर करायचा नियम आहे.बांधकाम कामगार तपासणी केन्द्रावर चहा पाणी नाष्टा यांची सोय करायची आहे पण या ठीकाणी बांधकाम कामगार यांना पाणी सुदधा दिल जात नाही,

हिंद लेब कडून नेमलेली मुल यांना रोज एवढया बांधकाम कामगार तपासणी करणेचे टारगेट ठरवून दिले आहे, तयांना १२००० पगार आहे तयाला कोणती डिग्री नाही,आय कार्ड नाही,रक्त घेता येत नाही, टेटसकोप नाही, कुठली जागेवर तपासणी नाही,रक्त घेतले मुळे काही ठीकाणी बांधकाम कामगार चक्कर येवून पडणेचा प्रकार घडत आहेत,यासाठी जबाबदार कोण,असा सर्व बोगस प्रकार आणि बांधकाम कामगार यांचे जीवाशी खेळ सुरु आहे, बांधकाम कामगार आरोग्य तपासणी करणेचे ठिकाणी खालील बाबी असण गरजेचे आहे,चहा पाणी नाषटा यांची व्यवस्था पाहिजे,लघवी तपासणी करणेसाठी महिला व पुरुष सवचछता गृहाची व्यवस्था पाहिजे,सक्षम व डिग्री असणारा डॉक्टर बांधकाम कामगार तपासणी केन्द्रावर असण गरजेचे आहे,बांधकाम कामगार तपासणी रिपोर्ट वर सत्य प्रति वर डॉक्टर यांची ओरिजनल सही पाहीजे.बांधकाम कामगार यांना आजारा नुसार लवकरात लवकर औषध पोहोच करण गरजेचे आहे,बांधकाम कामगार तपासणी रिपोर्ट हे मराठी मध्ये असण गरजेचे आहे,बांधकाम कामगार आरोग्य तपासणी महाराष्ट्र शासन कामगार विभाग महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांचेकडून बांधकाम कामगार यांना आपलया गरिबी अडाणीपणा पासून उपचारासाठी मोठा खर्च करण सोप नसत. यासाठी शासनाने बांधकाम कामगार यांचेसाठी,वयानुसार वजन,वयानुसार डोळे व्यवस्थित आहेत का, नाक कान घसा हे सर्व अवयवय व्यवस्थित आहेत का,हे सर्व तपासणी केले जातात,पण अशी कोणतीही सुविधा कामगार आरोग्य तपासणी करणारे केन्द्र यावर नाही,रक्त सकाळी उपाशी पोटी व जेवणानंतर तपासणी केल जाते.पण कामगार आरोग्य तपासणी केंद्रावर अशी कोणतीहि चहा नास्टा व्यवस्था नाही. मग रक्तातील रोपोर्ट खरा कसा,लघवी तपासणी करणेसाठी महिला व पुरुष अशी स्वतंत्र व्यवस्था कामगार आरोग्य केन्द्रावर केली जात नाही मग रिपोर्ट खरोखरच खरा आणि सापेक्ष आहे याच उत्तर कोण देणार,बी पी,शुगर,रक्त दाब, मलेरिया,काविळ,एच आय व्हि,थेराइड, प्लेटस,ह्मिोग्लोबीन,मॅग्नेशिअम,कॅलशियम,लाेह आर्यन,रक्तातील नायट्रोजन, युरिक असिड,कॉलेस्ट्रॉल,व्हिटॅमिन,कॅन्सर,एवढया आरोग्य टेस्ट बांधकाम कामगार यांचया साठी शासन राबवित आहे,

हिंद लाईफ केअर लिमिटेड गवरव्हेमेंट ऑफ इंडिया एंटर प्रायझेस ही आरोग्य कंपनी हे सर्व फुकट राबवत नाही शासन निर्णय २०२० ते २०२४ प्रयंत ही आरोग्य कंपनी काम करत होती आज २०२० ते २०२५ एकढा कालावधी वाढवून दिला आहे,पर पुरुष बांधकाम कामगार यांचेसाठी १६०० रुपये आणि महिला बांधकाम कामगार यांचे साठी १६४७ रुपये दिले जात आहेत. पण या पैशा नुसार बांधकाम कामगार यांना सुविधा दिली जाते का?.वरिल सर्व टेस्ट रिपोर्ट हे सर्व बांधकाम कामगार यांचे प्रयंत पोहोच होतात का?. झाले तर रिपोर्ट काय आहे. आपणास कोणता आजार आहे हे बांधकाम कामगार यांना इंग्रेजी भाषेत असल्यामुळे वाचता येणार का?. हे सर्व रिपोर्ट साधी सुटसुटित सोपी मराठी भाषेत देणेत यावीत म्हणजे बांधकाम कामगार यांना हे सर्व व्यवस्थित वाचता येतील,

इस्लामपूर मधील हिंद लँब अ गव्हरमेट ऑफ इंडिया या लँब कडे सांगली जिलहा सर्व बांधकाम कामगार आरोग्य रिपोर्ट देणेचे काम आहे मग आज जिलहयातील बांधकाम कामगार नोंदणी आणि आरोग्य तपासणी यांची एक आकडेवारी काढणेत यावी यानुसार प्रत्येक बांधकाम कामगार यांचे मेडिकल रिपोर्ट पोहच झाले का नाही याची चौकशी व्हावी,सदर मेडीकल लँब कोणाची आहे कामगार आरोग्य तपासणी रिपोर्ट देणेचा ठेका कोणी किती पैसे खाऊन दिला यांची चौकशी करणेत यावी बांधकाम कामगार यांचे आरोग्य रिपोर्ट घोटाळा केला म्हणून सदर हिंद लँब वर गुन्हा दाखल करणेत यावा, या हिंद लँब कडून बांधकाम कामगार आरोग्य रिपोर्ट वाटप करणेसाठी काही पर फाईल ४/५ रुपये देऊन मुल नेमली आहेत त्यांना वेळेवर पैसे दिले जातात का?. सांगली जिलहयातील विविध संघटना यांना हा सर्व बोगस प्रकार वर आणू नये म्हणून काही आरोग्य कंपनी आर्थिक हिससा देते का ?.

आज राज्यात जवळ पास लाखाचे वर बांधकाम कामगार नोदणी सक्रिय जीवीत आहे मग दर कामगार दर वर्षी ३९०० रुपये असा हिशोब केला तर तयाचा आकडा कुठच बसत नाही सेवा तर काहीच नाही बोगस बांधकाम कामगार आरोग्य तपासणी करुन या हिंद लेब व एच एल एल लाईफकेअर लिमिटेड एच एल एल भवन पुजापुरा तिरुअंनतपुरम केरला हया कंपनीने कोटयावधीचा घोटाळा केला आहे.अशा सर्व बोगस कर्मचारी व डॉक्टर यांना तवरित अटक करणेत यावे अन्यथा जिलहा भर उपोषन मोर्चा रस्ता रोको मंत्री पुढारी खासदार आमदार यांना घेराव व जिलहा बंदी करणार आहोत,

संस्थापक अध्यक्ष अहमद नबीलाल मुंढे ९८९०८२५८५९ बांधकाम कामगार व इतर श्रमजीवी कर्मचारी युनियन इस्लामपूर रुग्ण हक्क व अधिकार समिती सांगली जिल्हा. रेशन अधिनियम कायदा २०१३ रक्षक समिती सांगली जिल्हा.माहीती अधिकार नियोजन समिती सांगली जिल्हा.वरील सर्व पत्र व्यवहार प्रति मा.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई,मा सांगली सिव्हील दवाखाना सांगली,में एच एल एल लाईफकेअर लिमिटेड एच एल एल भवन पुजापुरा तिरुअंनतपुरम केरला,कामगार मंत्री तथा पालक मंत्री सांगली जिल्हा सुरेश भाऊ खाडे साहेब सो,मा.सहयक कामगार आयुकत भवन विश्रामबाग सांगली सो,मा पोलिस अधिक्षक सो सांगली जिल्हा सांगली,मा उप विभागीय पोलीस अधिक्षक इस्लामपूर ता वाळवा जि सांगली,मा सांगली जिल्हा अधिकारी सो सांगली,सांगली मा सहहयक कामगार आयुकत भवन विश्राम बाग सांगली.यांना रजिस्ट्रर करुन पाठवले आहे. सर्व बांधकाम कामगार यांना कळकळीची विनंती आहे, की एका जिल्ह्याती ही सत्य परिस्थिति आहे मग ३५ जिल्ह्यात काय असेल याचा बांधकाम कामगार संघटना पदाधिकारी आणि सर्व कामगार यांनी गांभीर्याने विचार करून संघटित होऊन जन आंदोलन केले पाहिजे.असे मी संस्थापक अध्यक्ष अहमद नबीलाल मुंढे ९८९०८२५८५९ बांधकाम कामगार व इतर श्रमजीवी कर्मचारी युनियन इस्लामपूर जाहीरपणे आवाहन करतो.

**अहमद नबीलाल मुंढे ९८९०८२५८५९**

**स्थलांतरित ..**

काही राज्यांत निघे
उद्योगाचा स्वर्ण धूर
उत्पन्नाचे सु साधन
किर्ती जाई सर्व दूर
रोजगार प्राप्तीसाठी
लांबून येतात मजूर
वस्तीला येतात सारे
ते घरेदारे सोडून दूर
कमी पगारात त्यांना
मजदूरी करणे मंजूर
घेतले जाई पिळवटू
बलाढ्यहोतात हुजूर
स्थानिकां ना नोकरी
उठते वेदनांचे काहूर
असून उद्योग गावात
बेरोजगारीची हूर हूर
पिकले इथे न विकते
कशीचेष्टा करता क्रूर
वाढती कंत्राटीभरती
नासत जातोयं नासूर
भरगब्बर उद्योगपती
खातात बदाम खजूर
स्थानिक स्थलांतरित
साठ मारी करी मजूर
किमानवेतन मिळावे
समस्या बनली मग्रूर
गरिबीश्रीमंतीची दरी
अरूंद करावी जरुर

**पितर तृप्त ..**

पितृ पक्ष संपतोयं
प्रसन्न चित्त पितर
छान झाला धंदा रे
खुशीत बाकी इतर
सालो साल चालते
धर्म नावाचे अत्तर
लगेचं बसे विश्र्वास
करावे जंतर मंतर
छळ करती पितर
भय ठसले भितर
खर्च असला मोठा
करे कोण नाहीतर
पिंडाचे गोळे खाती
कावळेबावळेतितर
खातात खरे पितर
कोण करतो खातर
कावळा हे माध्यम
कमी करतो अंतर
रुबाब आता त्यांचा
हाडतूड करा नंतर
बांधून ठेवे माणसा
श्रध्देचे छान सुत्तर
धर्म शास्त्रात सागंड
बदले तेंव्हा चित्तर

**--हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६,**
www.kavyakusum.com

# मागीतल्याने मिळणार नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही- महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृति समिती

मुंबइ(प्रतिनिधी) : महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील गलथान कारभार उजेडात आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले आहेत.आपण अनुभवतोय की एकेका केंद्रावर हजारो कामगार उपस्थित असतात परंतु त्याबद्दलचे नियोजन सरकारी दप्तरी नसल्यामुळे कामगारांवर अन्याय सुरू आहे. दुसरीकडे बोगस नोंदणी जोरदार सुरू आहे. बोगस आरोग्य तपासणी,शिबिरांच्या नांवें अक्षरशः लुटमार सुरु आहे. बांधकाम कामगार नसतांना ही त्यांची नोंदणी केली जाते. त्यांच्या पदरी आर्थिक लाभ मिळत आहेत. खऱ्या कामगारांची कागद पत्रे चुकीचे ठरवून नांव नोंदणी रद्द केली जात आहे. तर राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आयोजीत केलेल्या नांव नोंदणी शिबिरात विना विलंब नोंदणी केली जात आहे.त्या विरोधात तक्रार करण्याची न्याय व्यवस्था खालून वर पर्यन्त नाही.

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस आचारसंहिते मध्ये ऑनलाईन कामकाज बंद करण्यात आले.तेव्हा आपण निवडणूक आयुक्त मां. चोकलिंगंम यांची भेट घेतली होती.चर्चा केली होती. आपण इथेच थांबलो नाही तर बांधकाम कामगार संघटना कृती समितीच्या वतीने महाराष्ट्राचे कामगार आयुक्त डॉ.एच पी तुंबोड व सहाय्यक राज्य आयुक्त मा.शिरीन लोखंडे यांनाही भेटलो. बांधकाम कामगार कायद्याची अंमलबजावणी आणि किमान वेतन कायद्याचे अंमलबजावणी व्हावी अशी मागणी करण्यात आलेली होती. आत्ता पुन्हा विधानसभा निवडणुक आल्या तेव्हा पुन्हा कामकाज बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. इमारत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांचा महामंडळाचा पैसा,भांडे वाटप,जाहिरात,आणि आचासंहितेपूर्वी बोनस जाहीर करून लुटला जाणार आहे.मध्यान भोजन योजनेचे तीन तेरा कसे वाजले हे आपण अनुभवले. सध्या भांड्याचा संच व सुरक्षा संच वाटप चालू आहे. या सर्व टेंडर पास झाल्यानंतर कोट्यावधी पैश्याची उलाढाल होते.कल्याणकारी योजनेची सर्व ठिकाणी जोरदार जाहिरात बाजी चालू आहे. यावर किती खर्च होतो?.

कामगार आयुक्त कार्यालयामार्फत कामगार संघटनांना विश्र्वासात घेतले जात नसल्यामुळे सर्व प्रश्र्न तयार झालेले आहेत.जे एजेंट असतील त्यांची कामे जोरदार होतात.कामगार संघटनांची काम करण्याची पद्धत शासनानेच ठरवून दिलेली आहेत. त्यानुसार चालते. म्हणूनच जर बांधकाम कामगारांना न्याय मिळायचा असेल तर त्यांच्या लाभाचे वाटप कामगार संघटनांना विश्र्वासात घेऊन करणे आवश्यक आहे. मंडळाच्या योजनांचे सोशल ऑडिट झाले पाहिजे. कारभार पारदर्शी असला पाहिजे. नूतनीकरणाचे नियम बदलले पाहिजेत.अर्ज एका पंधरा दिवसात किंवा महिन्यात निकाली काढले पाहिजेत.या साठी कामगारांचा आवाज बुलंद झाला पाहिजे. रस्त्यावरच्या लढाई सोबत न्यायालयिन लढाई साठी पुरावे आणि कागद पत्रे एकत्रित केली पाहिजेत.हे सर्व विषय विचारात घेऊन आपण २८ सप्टेंबर २०२४ तारखेला एक दिवसाचे शिबिर आयोजित करीत आहोत.मा.ॲड.सुधा भारद्वाज या शिबिराला उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.दिनांक:- २८ सप्टेंबर,वेळ:- सकाळीं १० ते ४,स्थळ:- विश्र्व कमल हॉटेल, रूम नं.११९,पहिला मजला,शे.का.प.ऑफिस,सेक्टर ११, सीबीडी बेलापूर.पूर्व -नवी मुंबई.रेल्वे स्टेशन समोर.अधिक माहितीसाठी :- सागर तायडे ९९२०४ ०३८५९,प्रदीप शिंदे ९८९२३ ६७९८३,बिलाल खान ९९५८६ ६०५५६,विनिता बाळेकुंद्री ८०९७०६०७५२ यांच्याशी संपर्क साधावा.आपण सहभागी होण्यासाठी नांव नोंदणी केली तर व्यवस्था करण्यात अडचण येणार नाही.कारण आपण असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी कामगारांसाठी काम करतो,आपल्याकडे साधने आणि आर्थिक स्त्रोत नाही.हे लक्षात घेऊन बांधकाम कामगार संघटना पदाधिकारी यांनी सहकार्य करावे.कारण मागीतल्याने मिळणार नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही.

# प्रत्येक विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव विभाग प्रमुखाचे उत्कृष्ट अधिकाऱ्याचा सन्मान



लातूर/प्रतिनिधी:सन २०२३ -२४ या वर्षात केलेल्या अतुलनीय व उल्लेखनीय कामाबद्दल प्रत्येक विभागातून उत्कृष्ट काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याला व सर्व विभाग प्रमुखातून एका विभाग प्रमुखास उत्कृष्ट काम केल्याबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मानित आले.

भांडार विभाग प्रमुख भांडारपाल बालाजी काशिनाथ शिंदे तसेच संतोष लाडलापूरे यांना उत्कृष्ट स्वीय सहाय्यक म्हणून सन्मानित करण्यात आले. नंदा देवपुंजे,श्रीमती एस.एस.पोटे,एस.एस. धायगुडे यांना उत्कृष्ट शिक्षक तर आस्थापना विभागातून अभिमन्यू पाटील,असलम शेख, संकीर्ण पेन्शन विभागातून अनिकेत हापसे,लेखा विभागातून लहू तापकिरे, मालमत्ता विभागातून दीपक पवार,अग्निशमन विभागातून आनंद शिंदे, लेखा परीक्षण विभागातून पंडीत लोहारे,वाहन विभागातून वाहन चालक हक्कानी शेख,राजकुमार सोंत,जन्म -मृत्यू विभागातून सतिश कांबळे,झोन क्र.ए,बी,सी व डी वसूली विभागातून एक कर निरिक्षक व एक वसूली लिपीक म्हणून प्रदीप जोगदंड,दीपक कांबळे,प्रकाश खेकडे, अली चाऊस,गुलाब शेख, ज्ञानदेव पर्वते,तहेमीत शेख,गफार शेख,भांडार विभागातून दया नंदकिशोर,नागरी सुविधा केंद्रातून चाऊस महमद नासर,संगणक विभागातून करीम शेख , विधी विभागातून प्रभाकर चव्हाण,पाणी पुरवठा विभागातून जलील शेख भुयारी गटार विभागातून अक्तर शेख,घरकुल योजना विभागातून हणमंत जाधव,आरोग्यं विभागातून डॉ.श्याबमा जाधव,लखन कांबळे व झोन ए,बी,सी,डी मधील लाईट विभागातून नजीर पठाण,दत्ताल येलशेट्टे, जोहर शेख,अनिल उबाळे,मैनोद्दीन शेख यांना आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते गौरवपत्र देण्यात आले.

यावेळी मनपाचे अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार,उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्या लेखापरिक्षक तथा उपायुक्त श्रीमती कांचन तावडे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे,सहाय्यक आयुक्त मंजूषा गुरमे,निर्मला माने,अजित ढोपे, खदीर शेख आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमांचे सुत्रसंचलन जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे यांनी केले

# सर्व पक्षांनी एकसंघ होऊन मराठवाड्याच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी लढले पाहिजे- माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर : मराठवाड्यावरती निजामांनी २२४ वर्षे हुकूमशाही पध्दतीने राज्य चालविले. या कार्यकाळात निजामांनी जनतेचे शोषण, अन्याय, अत्याचार, व्याभिचार मोठ्या प्रमाणात केला. कासिम रझवीच्या रझाकार या संघटनेचे अतिरेक केला. या अन्यायाविरूध्द क्रांतीकारी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देविसिंग चव्हाण, बाबासाहेब परांजपे, शेषरावजी वाघमारे या परिवर्तनवादी स्वतंत्र्य सैनिकांनी निजामांविरूध्द बंड उभारले. शेकडो लोकांनी आपले बलिदान दिले. या लढ्याला देशाचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी साथ देऊन १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्त झाला. प्रांतवार रचनेनुसार मराठवाडा महाराष्ट्रामध्ये बिनशर्त सामील झाला. लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय सेवेत नोकर्या व विभागाच्या विकासासाठी निधी जाहीर केला जाईल अशी घोषणा विधानसभागृहात केली, परंतु त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. यासाठी लोकप्रतिनिधींनी व सर्व पक्षांनी पक्ष विरहीत एकत्र येऊन मराठवाड्याला न्याय देण्यासाठी लढा दिला पाहिजे. असे अभ्यासू विचार माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मराठवाडा स्वातंत्र्यदिनाच्या समारोहात मांडले.



यावेळी ते मराठवाडा जनविकास संघ व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ग.दी. गाडगुळकर नाट्यगृह, संभाजी चौक, प्राधिकरण निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे आयोजित मराठवाडा मुक्ती संग्राम महोत्सव -२०२४ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस, खा.ओमराजे निंबाळकर, खा.श्रीरंगजी बारणे, खा.डॉ. शिवाजीराव काळगे, कार्यक्रम संयोजक अरुणराव पवार, उपाध्यक्ष प्रकाशराव इंगोले, प्रसिध्द व्याख्याते गंगाधर बनबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, मराठवाड्याचा सन १९९५ मध्ये ४ हजार कोटीचा अनुशेष होता. त्यानंतर डॉ.केळकर समितीने साठ हजार कोटी असल्याचे जाहीर केले तर आजही तीन लाख कोटीचा अनुशेष रखडल्याचे सत्य समोर आले आहे. देशामध्ये आर्थिक अडचणीमुळे सर्वाधिक शेतकरी आत्महत्या मराठवाड्यात होत आहेत, हे थांबविण्यासाठी शेतकर्यांच्या मालाला एमएसपी देऊन त्याचे कायद्यात रूपांतर करावे, उजनीच्या धरणातून वाहून जाणारे २४ टीएमसी पाणी त्वरीत आणावे, मराठवाडा वॉटरग्रिड योजना राबवावी, उद्योगवाढीसाठी या विभागाला ईसीझेड योजना लागू करावी, लातूर हे शैक्षणिक हब असल्यामुळे विद्यापीठ उपकेंद्राला विद्यापीठ करावे, आयआयएम सारखे युनिट सुरू करावे व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची सन २०२० मध्ये मुदत संपलेली आहे, त्याचे पुनर्जिवन त्वरीत करावे. याबरोबरच सिंचन, शिक्षण, कृषी, रस्ते व ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रातील अनुशेष भरून काढावा अशी अपेक्षाही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

यावेळी या कार्यक्रमाला सहसचिव धनाजी येळकर, कोषाध्यक्ष शंकर तांबे, बाबासाहेब त्रिभूवन, नरेंद्र माने, ऋतुराज कदम पाटील, बळीराम माळी, सुवर्णा इंगोले, अनिताताई पांचाळ, जीवन बोर्हाडे, सचिन स्वामी, मनोज मोरे, अभिमन्यू पवार, युवराज माने, सूर्यकांत कुरूलकर, गोपाळ माळेकर, भिमाशंकर भोसले, अनुराधा पवार, शारदाताई मुंडे, बाळासाहेब साळुंके, विठ्ठल नवाने, अमोल लोंढे, दिनेश पांढरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कु.ऋतुजा मगडलवार हिचे मैदानी स्पर्धेतील यश

बाभळगाव : दयानंद शिक्षण



प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावच्या कु. ऋतुजा बालाजी मगडलवार या विद्यार्थी खेळाडूनी मैदानी स्पर्धेमध्ये विविध क्रीडा प्रकारामध्ये नेत्रदीपक कामगिरी करून यश संपादन केले आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, लातूर या ठिकाणी संपन्न झालेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये ऋतुजा मडगलवार हिने १०० मीटर धावणे, ३००० मीटर धावणे व गोळा फेक या मैदानी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

या यशाच्या निमित्ताने दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष आमदार धीरज देशमुख, सचिव शाम देशमुख, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा मार्गदर्शक डॉ. वैशाली माढेकर, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. तिला डॉ. नाना जाधव, राजकुमार अंबुलगे यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयामध्ये क्रीडा विभागाच्या वतीने मडगलकर हिचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ.अभिजीत बादाडे, प्रा. चंद्रकांत मोरे, हणमंत शिंदे, डॉ. दशरथ भिसे, प्रा. संतोष कल्याणकर, डॉ.पांडुरंग मुंढे यांची उपस्थिती होती.

# भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी देशातील २० नद्या एकमेकांशी जोडणार - केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील



पुणे, : प्रत्येक घरात पाणी पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार 'हर घर जल' योजना राबवित आहे. पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमीनीत मुरवणे आवश्यक आहे. भविष्यातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी पाण्याचा पुनर्वापर करावा. देशातील लोकसंख्या, पशुधन, शेती यांना पाण्याची पुरेशी उपलब्धता असावी, यासाठी पुढील दोन महिन्यात देशातील २० नद्या एकमेकांशी जोडण्यात येणार, असे प्रतिपादन केंद्रीय जलसंसाधन मंत्री सी. आर. पाटील यांनी केले.

गणेश कला क्रीडा मंच येथे नाम फाऊंडेशनच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, सुरतच्या आमदार संगीता पाटील, नाम फाऊंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर, संस्थापक मकरंद अनासपुरे उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. पाटील म्हणाले की, 'हर घर जल' योजनेमुळे महिलांची पाण्यासाठीची भटकंती थांबली. देशातील महिलांचे दररोजचे साडेपाच कोटी तास वाचले आहेत. त्या वेळेचा उपयोग आर्थिक स्वावलंबनासाठी होऊ लागला आहे. शुद्ध पाणी घरी आल्यामुळे जलजन्य आजार कमी होऊन औषधावरील खर्च कमी झाला. जलसंधारणाच्या अनेक योजनांना गती देण्यात येत आहे. यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगला प्राधान्य देण्यात आले आहे. जगाच्या १८ टक्के लोकसख्या भारतात आहे. या तुलनेत स्वच्छ व पिण्यालायक पाणी केवळ ४ टक्के उपलब्ध आहे. भविष्यात देशातील लोकसंख्या, पशुधन, शेती यांना पाण्याची पुरेशी उपलब्धता असावी यासाठी पुढील दोन महिन्यात देशातील २० नद्या एकमेकांशी जोडण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येकाला पर्याप्त पाणी उपलब्ध होऊ शकेल. पाण्याची कमतरता भरुन काढण्यासाठी सर्वतोपरी कामे सुरु आहेत. यास समाजाचाही पाठिंबा आवश्यक आहे. पुढील काळात प्रत्येक घरावर रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्यात येईल. भावी पिढीला पाण्याची कमतरता भासू नये यासाठी सर्वांच्याच प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून होत असलेले काम यादृष्टीने अत्यंत प्रशंसनीय आहे.

**जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये 'नाम' फाउंडेशनचा मोठा वाटा -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



नाम फाउंडेशनने राज्यातील सर्वाधिक दुष्काळी भागात परिवर्तन घडवून आणले. जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये नाम फाउंडेशनचा मोठा वाटा आहे. देशातील सर्वांत जास्त मोठी धरणे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातील ५५ टक्के भाग अवर्षणप्रवण आहे. महाराष्ट्रातील पाणी समस्येवरील उपाय शोधण्यासाठी जलयुक्त शिवार कार्यक्रमाची शासनाने आखणी केली. या कार्यक्रमाला नाम फाऊंडेशनने लोकचळवळीत रुपांतरीत केले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नाम फाउंडेशनने एक हजार पेक्षा जास्त गावांमध्ये वेगवेगळी कामे केली. दुष्काळी भागातील जलसंधारणाची कामे, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण, मुलींचे लग्न, महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम त्यांनी केले. सर्वसामान्यांची दुःखे आत्मसात करुन नाम कार्य करत आहे. महाराष्ट्रात जोपर्यंत जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर होणार नाहीत, पाण्याचा थेंब न थेंब जोपर्यंत जमिनीत मुरणार नाही, तोपर्यंत शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. हे ओळखून शासनाने जलयुक्त शिवार ही योजना प्राधान्याने राबविली. त्यातून मोठ्या प्रमाणात पाणी साठवण झाली. अनेक गावे पाणीदार झाली आहेत. जलसंधारणामुळे शेती समृद्ध झाली. हे काम अव्याहत चालणारे असून जलसंधारणाच्या कामाला अधिक गती देण्यासाठी नाम फाउंडेशन सारख्या अन्य संस्थानी एकत्र येऊन काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

यावेळी नाम फाऊंडेशनबद्दल बोलताना ते म्हणाले, नाम फाऊंडेशनने लोकांची मानसिकता बदलली. लोकांना पाण्याचे इंजिनिअरिंग शिकविले. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यात सामान्य माणसाचे दु:ख जगण्याची क्षमता असल्यामुळे अनेक लोक त्यांच्याशी जोडले गेले. त्यांच्या संस्थेचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजपरिवर्तन घडवू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे.

**नाम फाऊंडेशनचे काम भविष्यातील कार्याला उर्जा देणारे- उद्योगमंत्री उदय सामंत**

नाम फाऊंडेशनचे कार्य अत्यंत प्रामाणिक आणि पारदर्शी असून कौतुकास्पद आहे. सामाजिक कार्य करणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांचा महाराष्ट्राला सार्थ अभिमान असून त्यांचे काम भविष्यातील कार्याला उर्जा देणारे आहे, असे गौदवोद्गार उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काढले.



नाम फाऊंडेशनने विविध क्षेत्रात केलेल्या विधायक आणि पारदर्शी कामाचा आदर्श सर्वांनी घ्यावा. कंपन्यांनी त्यांना मिळणारा सीएसआर फंड सामाजिक उपक्रमांना मोठ्या प्रमाणात द्यावा असे आवाहन मंत्री श्री. सामंत यांनी केले. यावेळी मंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते नाम फाऊंडेशनचे विश्र्वस्त, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, एनडीआरएफच्या जवानांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला सीआरपीएफचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री. निंबाळकर, नाम फाऊंडेशचे सदस्य मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी निधीची भरीव तरतूद - पालकमंत्री अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर(जिमाका) : अल्पसंख्याक समाज घटकांच्या शैक्षणिक ,आर्थिक , व्यावसायिक विकासासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाला ५०० कोटी रुपयाची भरीव आर्थिक तरतूद केली असून त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, लघुउद्योजकांना कर्ज पुरवठा व प्रशिक्षण देण्यात येईल, असे अल्पसंख्यांक व औकाफ, सहकार व पणन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

हज हाऊस येथील सभागृहात मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. अल्पसंख्यांक आयुक्त मोहीन ताशिलदार, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री मगदूम, यांच्यासह लाभार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण पैशाअभावी थांबू नये यासाठी कर्ज योजना,परदेशामध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, उद्योग कर्जपुरवठा, बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी कर्ज पुरवठा, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. याचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थि, नागरिक यांनी घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. सत्तार यांनी केले.

मंत्री श्री. सत्तार यांनी सांगितले की, एक दिवसीय प्रशिक्षणाच्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया अर्जासाठी लागणारी कागदपत्रे याबाबतचे प्रशिक्षण व माहिती देण्यात येत आहे, याचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील सर्व घटकांनी घ्यावा. अल्पसंख्याकांना शिक्षण देणाऱ्या मदरशांना देण्यात येणारे अनुदान २ लाखांवरून १० लाख करण्याचा प्रस्ताव लवकरच शासनाकडे सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वक्फ बोर्डमध्ये मदरशांची नोंदणी व आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी कर्ज घेतले असेल आणि या शिक्षणादरम्यान त्याचा मृत्यू झाला असेल तर त्याचे शैक्षणिक कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पाच जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात वसतिगृहाची निर्मिती करण्यात येणार आहे. यात छत्रपती संभाजीनगरमध्ये नारेगाव, नाशिक जिल्हा मालेगाव, नागपूर, मुंबई येथे वसतिगृह सुरू येणार असल्याचेही यावेळी सांगितले.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूरीचे प्रमाणपत्र वाटप पालकमंत्री श्री. सत्तार यांनी केले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894